महाराष्ट्र शासन
"आपली सेवा आमचे कर्तव्य"
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नागपूर
सक्करदरा चौक, उमरेडरोड, राजेरघुजी नगर, नागपूर-४४००२४
कार्यालय : (०७१२) २७४९१९८ | अधिष्ठाता : (०७१२) २७५७००२ | ईमेल :govtayurcollegenagpur@gmail.com

क्रं.शाआमना/झाडे कटाई/ 3840 /२०२६. दि. 27/ ऑगस्ट २०२६.

प्रति
महाविद्यालय संकेतस्थळ
महाविद्यालय नोटिस बोर्ड
**Quotation**

## दरपत्रक सुचना

शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय सक्करदरा चौक नागपूर येथील परीसरामधील असलेली विविध प्रकारची उभी असलेली झाडे कापणी साठी ना.म.पालीका उद्यान विभाग यांचे परवानगी पत्र दिनांक २४.०८.२०२६ च्या अनुषंगाने झाडे कापने व उचल करणे यांचे दरपत्रक पध्दतीने विक्री करणे करीता इच्छुक कत्राटदाराने सहभागाकरीता सदर सुचना प्रसिध्द करण्यात येत असुन त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**या संस्थेतील प्रस्तावित महाविद्यालय नविन इमारतीच्या जागेमध्ये असलेली एकुन झाडे १३८**

**पुरातन (हेरीटेज) केशिया-२, रेनट्री-३, निलगिरी-१, पेल्ट्राफार्म-८, चिचबिलाई-३. व नॉन हेजीटेज अशोका-२, कडुनिम-९, सागवन-२,केशिया-१२,पेल्ट्राफार्म-३८ करजी-६ आडजात-२,सुबाभुळ-३२,चिचबिलाई-२, चिच-४,चिचवा १ बेहडा .१ व संपुर्ण वाळलेली १० अशी एकुन (१३८) सदर झाडान पैकि (झाड क्र ३३ चिचबिलाई/झाड क्र ३४ चिचबिलाई/ झाड क्र ३५ रेनट्रि ) हि झाडे वाचवायची असल्याने सदर तिन झाडे पुरातन असल्याने तोडण्यात येवु नये**

उपवनसंरक्षक नागपूर वन विभाग नागपूर यांचे दिनांक ५/०८/२०२५ च्या पत्राच्या अनुषंगाने वरील झाडांचे ठरवुन दिलेल्या मुंल्याकन रक्कम रु ७५०००/- रक्कमेपेक्षा कमी कीमतीचे दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही.
१)अधिष्ठाता शासकिय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, नागपुर या संस्थेतील परिसरामध्ये असलेल्या विविध प्रकारची कापनी करावयाची उभी झाडे यांनाच दर लागू राहील.दरपत्रका बाबतची माहीतीwww.gacnagpur.org या संकेतस्थळावर उपलब्ध असुन सदर दरपत्रके सादर करावी.

२)इच्छूक कंत्राटदारानी **दि.३१/०८/२०२६ ते दि.०५/०९/२०२६** या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत (सायं.५.०० वाजेपर्यंत) दरपत्रके कार्यालयात सादर करावी दर पत्रके सादर करते वेळेस दरपत्रकात झाडे कापणे व उचल करणे तसेच इतर सर्व खर्चाचा समावेश करुन यांची एकुन किंमत दर्शवुन त्या वरील जीएसटीची रक्कम वेगळी दर्शवावी सदर लिफापा लाखेने सिलवंद करावा व लिफाप्यावर दरपत्रकाचा क्रमांक व दरपत्रकाचा मजकुर, दरपत्रकाची अंतीम मुदत नमुद करावी.
**तसेच दरपत्रक सादर करते वेळेस अनामत रक्कम म्हणुन राष्ट्रीयकृत बॅकेचा २५०००/- चा डि.डि. सोबत जोडावा अन्यथा आपले दरपत्रक स्वीकारण्यात येणार नाही तसेच लिफापा व २५०००/- हजाराचा डि.डि. स्वताहा उपस्थित राहुन विहीत मुदतीच्या आत कार्यालयात सादर करावा उशिरा प्राप्त झालेले दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही.**

३)उपरोक्त प्रमाणे अनामत रक्कम म्हणुण जमा केलेल्या २५०००/- रक्कमेचा डि डि दरपत्रकाची कार्यवाही पुर्ण झाल्या नंतर ज्याचे दर पत्रक स्वीकारण्यात आले त्यांच्या कडुन झाडे तोडण्याची संपुर्ण प्रकिया पुर्ण झाल्यानंतर परत करण्यात येईल.

1185

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

४)इच्छूक दरपत्रकदारकाचे बंद पत्रके दस्ताऐवज व अन्य बावतची पडताळणी संस्थेतील बांधकाम समितीकडुन करुन त्यांना सहभागी होण्यासाठी पात्र करण्यात येईल.

५)उक्त नमूद कालावधीच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दर पत्रकाद्वारे तोडणी करुन विक्री करावयाची विविध प्रकारची उभी असलेली झाडे लिलावदार यांना पाहायची मुभा आहे.

६)दरपत्रकामध्ये जे लिलावदार एच-१ मुल्यांकन दराच्या वर राहील व त्याचे दरपत्रक स्वीकारल्यानंतर व त्यांना आदेशित केल्या नंतर झाडांची कटाई करुन उचल करण्यापूर्वी आदेशातील अटी व शर्ती लागू राहतील. तसेच मंजूर करण्यात आलेल्या निविदाकारास रु.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर करारनामा करावा लागेल.तसेच सोबतच मंजुर झालेल्या दर पत्रकाची रक्कम कार्यालयात जमा करावी लागेल.त्या नंतरच झाडांची कटाई सुरु करता येईल.

७)ज्या दरपत्रकाच्या स्विकृतीनंतर त्वरीत कामास सार्वजनिक बांधकाम विभाग व कंत्राटदार तसेच विभाग प्रमुख द्रव्येगुन विभाग शा.आ.महा.नागपूर यांच्या निर्देशनाखाली झाडे कापणे व उचल करणे याची सुरुवात करावी लागेल. संपूर्ण झाडे कापणे व उचल करणे हि सर्व प्रक्रीया दहा दिवसांच्या आत करावे लागेल. सदर कामास विलंब झाल्यास प्रतिदिवस रु.५००/- प्रमाणे क्षतीपुर्ती आकारण्यात येईल.

८)संस्थेत उभी असलेली विविध प्रकारची झाडे कापणे व उचल करणे या बावत मागविण्यात येत असलेले दरपत्रके रदद करण्याचा अथवा यामध्ये बदल करावयाचा अधिकार अधिष्ठाता शासकिय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय यांच्याकडे राखुन ठेवण्यात येत आहे.

९)झाडे तोडणा-या कंत्राटदारास सुचित करण्यात येते कि नागपूर महानगपालीका यांनी झाडे तोडण्यासाठी दिलेल्या परवानगी पत्र क्र NMC/OWL/GRDN/2026-27/15338 दि २४.०८.२०२६ मध्ये नमुद करण्यात आलेल्या उपरोक्त झाडांचीच कापनि करावी त्या व्यतीरीक्त अन्य कोणत्याही झाडांची कापनी करण्यात येऊ नये तसेस झाडे कापन्याची कार्यवाही करतांना कोणतीही वित्त व जिवीत हानी होणार नाही याची दक्षत घ्यावी लागेल तसे आढळल्यास पुढिल कार्यवाहीस सर्वस्वी सवंधीत कंत्राटदार जबावदार राहील याची नोंद घ्यावी.

१०)दरपत्रकासोबत लिलावदार, कंत्राटदार यांनी नागपूर महानगर पालीका यांच्या कडे कींवा शासनाकडे नोंदणीकृत केलेल प्रमाणपत्र, आधारकार्ड व भ्रमणध्वनी क्रमांक जी एस टि प्रमाणपत्र सोबत जोडण्यात यावेत.

अधिष्ठाता

शासकिय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय,

नागपुर



Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner